# <u>नियमित दिवाणी दावा क्र. ३३/२०२० मधील नि.क्र. २१ वरील आदेश</u>

(CNR NO MHRG14-0002192020)

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १, ३/१ ते ३/३ यांनी त्यांस दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. वादीने सदर अर्जावर हरकत घेवून असे कथन केले आहे की, प्रतिवादीचा सदरचा अर्ज बनावट व खोटया स्वरुपाचा असल्याने सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा हक्क प्रस्थापनेकरीता, वाटपाकरीता आणि निरंतरचे हुकूमाकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १, ३/१ ते ३/३ यांना दाव्याचे समन्सची बजावणी झालेनंतर कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे त्यांना वकीलांना म्हणणे देण्यासाठी संपर्क साधता आला नाही. त्यामुळे कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. सदर प्रतिवादी हे त्यांची कैफियत दाखल करुन दाव्यास विरोध करत असून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता सदर प्रतिवादींना झालेला विलंब माफ करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे योग्य होईल. वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## <u>आदेश</u>

प्रतिवादी क्र. १, ३/१ ते ३/३ यांचा मंजूर करणेत येत आहे.

ठिकाण – उरण (निलेश म. वाली)

दिनांक – ०५.०७.२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.